


आपल्या आजूबाजूला असणाऱ्या यशस्वी माणसांचं मी बारकाईने निरीक्षण करत असे. विद्यार्थी सहायक समितीमध्ये असताना विविध क्षेत्रांतील अनेक मान्यवरांना जवळून बघण्याची संधी मिळाली. पण, केवळ या व्यक्तींना भेटण्यापेक्षा त्या यशस्वी कशा झाल्या असतील याचा विचार मी करत असे. त्यासाठी यशस्वी माणसांची चरित्रं वाचून काढली. त्यातूनच मला प्रेरणा मिळाली.

**– मंदार जोगळेकर,** संस्थापक, माय विश्व

# यशाचा 'विश्व'व्यापक मंत्र



**'माय विश्व' या कंपनीच्या माध्यमातून सातासमुद्रापार मराठी बुद्धिमत्तेचा झेंडा फडकावणारे मंदार जोगळेकर यांनी अत्यंत प्रतिकूल परिस्थितीवर मात करत यश मिळवलं. या तरुणाचा प्रवास प्रत्येक तरुणाला प्रेरणादायी ठरेल.**

**इच्छा असेल तिथे मार्ग दिसतो, असं म्हणतात. पण इच्छेला कृतीची जोड नसेल तर काहीच साध्य होत नाही. परिस्थिती कितीही प्रतिकूल असली तरी आपली ध्येय निश्चित असल्यानंतर प्रामाणिकपणा, चिकाटी, जिद्द या गुणांवर तेथपर्यंत निश्चित पोहोचता येतं. मंदार जोगळेकर या तरुणाने अत्यंत प्रतिकूल परिस्थितीवर मात करत सातासमुद्रापार मराठी तरुणांच्या बुद्धिमत्तेचा झेंडा फडकवत हेच सिध्द केलं आहे. मंदार जोगळेकर असं या तरुणाचं नाव असून माय विश्व या कंपनीच्या माध्यमातून इंटरनेटविश्वात त्याने स्वतःचं वेगळं स्थान निर्माण केलं आहे. मराठी, हिंदी, इंग्रजीसह विविध भाषांमधील वृत्तपत्रांच्या इंटरनेट एडिशनसाठी मायविश्वर ई–गॅलरीची मोठी स्पेस उपलब्ध करून देऊन जोगळेकर यांनी जगाशी नातं जोडलं आहे. कोकणातून शिक्षणाच्या ओढीने पुण्यात आलेल्या मंदार जोगळेकर यांनी विद्यार्थी सहायक समितीच्या आधाराने आपलं शिक्षण पूर्ण केलं. अनेक अडचणींवर मात करून त्यांनी माय विश्वची स्थापना केली आणि आज साऱ्या जगभर या कंपनीचं जाळं पसरलं आहे. अमेरिकास्थित या कंपनीच्या माध्यमातून मंदार जोगळेकर यांनी अनेक बुद्धिमान तरुणांना रोजगार उपलब्ध करून दिला आहे.**

आपल्या या प्रवासाविषयी बोलताना मंदार जोगळेकर म्हणतात, वास्तविक, सॉफ्टवेअर हे माझं क्षेत्र नाही. पण बुद्धिमत्तेच्या आणि प्रबळ इच्छाशक्तीच्या बळावर आपण काहीही साध्य करू शकतो, हा आत्मविश्वास होता. कोणत्याही क्षेत्रात उत्तम सेवा, गुणवत्ता दिली तर यश मिळतंच. आपल्या बरोबर काम करणारी माणसं निवडणं हेही कौशल्याचं काम असतं. जोगळेकर यांनी स्वतः प्रतिकूल परिस्थितीचा अनुभव घेतला असल्यामुळे स्वतःची कंपनी स्थापन करतानाही त्यांनी ग्रामीण भागातून आलेल्या बुद्धिमान तरुणांनाच प्राधान्य दिलं. आज हे तरुण माय विश्व ही आपलीच संस्था असल्याच्या भावनेतून काम करतात.

मंदार जोगळेकर हे नाव आज यशस्वी उद्योजक म्हणून दिसत असलं तरी त्यामागे मोठी तपश्चर्या आहे. एका अमेरिकन कंपनीला पुण्यात त्यांचं कार्यालय सुरू करायचं होतं आणि त्यासाठी तंत्रज्ञान, व्यवसाय यांची माहिती असणाऱ्या व्यक्तीची आवश्यकता होती. ही संधी मंदार जोगळेकर यांनी घेतली. आपल्या यशाच्या मूलमंत्राबाबत बोलताना मंदार म्हणतात, आपल्या आजूबाजूला असणाऱ्या यशस्वी म णसांचं मी बारकाईने निरीक्षण करत असे. विद्यार्थी सहायक समितीमध्ये असताना विविध क्षेत्रांतील अनेक मान्यवरांना जवळून बघण्याची संधी मिळाली. पण, केवळ या व्यक्तींना भेटण्यापेक्षा त्या यशस्वी कशा झाल्या




असतील याचा विचार मी करत असे. त्यासाठी यशस्वी माणसांची चरित्रं वाचून काढली. त्यातूनच मला प्रेरणा मिळाली.

प्रतिकूल परिस्थितीही मला मिळालेली देणगी होती या दृष्टिकोनातून मी परिस्थितीकडे पाहिलं, तशी परिस्थिती नसती, सगळं काही सहज मिळालं असतं तर त्या गोष्टींचं मोल मला कळलं नसतं. या परिस्थितीमुळेच मला पुढे जाण्याचं बळ मिळालं, असं मंदार जोगळेकर सांगतात. यासाठी आत्मविश्वास, सकारात्मक दृष्टिकोन हवा. तो स्वतःच विकसित करता येतो, असंही ते म्हणतात. आज अनेक तरुण निराशेपोटी आत्महत्त्यांचा मार्ग स्वीकारत असताना त्यांनी मंदार जोगळेकर यांच्यासारख्या तरुणांकडून बरंच काही शिकण्यासारखं आहे. आपल्या आजूबाजूला नकारात्मक ऊर्जा असणारेही अनेक लोक असतात. अशी नकारघंटा वाजवणाऱ्या लोकांपासून स्वतःला दूर राहून सकारात्मक विचारसरणीच्या माणसांच्या सहवासात रहावं असा सल्ला मंदार देतात. स्वतः कमावून शिकताना श्रम आणि पैशांचं महत्त्व लक्षात आलं असं ते म्हणतात.

कोणत्याही क्षेत्रात येताना त्या क्षेत्राची गरज काय आहे, याचा शोध घेता आला पाहिजे. यासाठी निरीक्षणशक्ती चांगली हवी, असं मत मंदार जोगळेकर व्यक्त करतात. ही गोष्ट स्पष्ट करताना विद्यार्थी सहायक समितीमधीलच उदाहरण देतात. स्वतः विद्यार्थी म्हणून शिकत असताना आम्हाला सकाळी एक कपभर दूध मिळायचं. तेवढ्या दुधावरच दुपारच्या जेवणाची वाट पहावी लागायची. दुधाबरोबर पावाचे दोन स्लाईस मिळाले तर थोडी भूक भागेल, असं त्यावेळी वाटायचं. पुढे मी याठिकाणी स्वतःच पावाचे स्लाईस विकायला सुरुवात केले. त्यामुळे मुलांचीही गरज भागू लागली. स्वतःच्या गरजेतूनच या गोष्टीचा शोध लागला. कोणताही व्यवसाय करताना फायद्याचा विचार असावाच, पण त्याचा समाजाला काय फायदा होईल, याचाही विचार करणं आवश्यक आहे, असं मत मंदार जोगळेकर व्यक्त करतात. माझा शैक्षणिक प्रवास पाहिलेले अनेक जण मी या क्षेत्रात कसा आलो, या विषयी आश्चर्य व्यक्त करतात असं मंदार जोगळेकर सांगतात. केवळ पुस्तकी ज्ञानापेक्षा व्यवहारज्ञान महत्त्वाचं आहे, असा सल्लाही ते देतात. फक्त घोकंपट्टी करून यश मिळत नाही. त्यासाठी इतरांपेक्षा वेगळा विचार करण्याची क्षमता असायला हवी. प्रयत्नांनी ही क्षमता विकसित करता येते, असंही मंदार सांगतात. त्यांचा हा प्रवास आणि मार्गदर्शन अनेक तरुणांना प्रेरणादायी ठरेल, यात शंकाच नाही.

**('माय विश्व' ही जगातील एक प्रथितयश इंटरनेट पेपर व्यवस्थापन करणारी संस्था आहे. जगातील १७ भाषांतील सुमारे २५० वर्तमानपत्रांचे व्यवस्थापन ती करते. त्याचबरोबर माय विश्ववर मराठी भाषेतील इनसाक्लोपेडियाही उपलब्ध करून देण्यात आला आहे.)**

◆◆◆